# अमरावती महानगरपालिका, अमरावती

## दिनांक ०३/०२/२०२५ रोजी प्राप्त तसेच

## दिनांक २४/०३/२०२५ रोजी मंजुर सर्वसाधारण सभा ठरावाची प्रत

**(प्रशासकीय विषय)**

विषय क्रमांक २०८ - अमरावती मनपा चे स्थानिक हमालपुरा येथील अतिक्रमण विभाग कार्यालय परिसरातील जिर्ण झालेले शौचालय पाडण्याबाबत.

ठराव क्रमांक २०८ - उपरोक्त संदर्भान्वये वरील विषयाच्या अनुषंगाने प्रस्तावित करण्यात येते कि, मनपा झोन क्र ३ हमालपुरा मुख्य कायालय येथील वरील विषयांकित मनपा चे शौचालय पूर्णतः शिकस्त झालेले असुन वापरायोग्य नसल्याने सदर बांधकाम पाडून टाकण्याबाबत स्थानिक नागरिकांनकडून तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार सदर शौचालय पाडण्याबाबत आरोग्य विभाग, बांधकाम विभाग व अतिक्रमण विभाग यांचे मार्फत जागेची व इमारतीची पाहणी करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर इमारत पाडण्यबाबत आरोग्य विभागाचे नाहरकत घेऊन प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करून मा.आयुक्त यांनी दि. १४/०१/२०२५ रोजी सदर बांधकाम पाडण्याबाबत प्रशासकीय मंजुरी प्रदान केली आहे. सदर शौचालय हे मनपा मालकीची इमारत असुन त्याची नोंद मालमत्ता विभागातील अभिलेखात असल्याने सदर इमारत पाडण्यापुर्वी सक्षम प्राधिकरण तथा मा.महासभेची मान्यता घेणे अभिप्रेत आहे. त्यानुसार प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. मान्यता प्राप्त नंतर सदर इमारत पाडण्याची प्रक्रिया अतिक्रमण विभागामार्फत करण्यात येईल.

उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीथ विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

स्वा./-
नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती

स्वा./-
प्रशासक
महानगरपालिका,अमरावती

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.